क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ (ॲक्सिस-Paypro)/७३/२०१८ मुंबई, दि.११/०२/२०१८

**संदर्भ :-**
१) शासन निर्णय गृहविभाग क्र.बीयुडी-०११७/प्र.क्र.२/आस्था-१, दि.१०/०४/२०१७
२) शासन निर्णय गृहविभाग क्र.बीयुडी-०११७/प्र.क्र.२/आस्था-१, दि.१९/०८/२०१७
३) या कार्यालयाचे परिपत्रकीय आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/१७/२०१८,दि.०७/०४/२०१८
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन प्रणाली/९०/२०१८, दि १७/०५/२०१८

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील कर्मचारी यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत.

******

## आदेश

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यातील पोलीस दलातील विविध संवर्गातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी घरबांधणी अग्रीमाकरिता बँकामधून कर्ज घेऊन महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिली आहे.

२. त्यास अनुसरुन सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना आय. सी. आय. सी. आय. बँक लि. या वित्तीय संस्थेमार्फत प्राप्त झालेली रक्कम आहरण व संवितरण अधिकारी यांच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि. १४.०४.२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील तरतूदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका - १९७८ भाग पहिला उपविभाग - एक मधील अनुक्रमांक ११ नियम १३४ अन्वये संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्यांचे घरबांधणी अग्रीमाचे आदेश या कार्यालयाच्या संदर्भाधिन दि. ०७/०४/२०१८ च्या परिपत्रकातील सुचनांप्रमाणे निर्गमित करावेत.

३. प्रस्तुत प्रकरणी आहरण व संवितरण अधिकारी यांच्या बँकेच्या खात्यामध्ये जमा केलेली रक्कम त्याच दिवशी संबंधित अग्रीम धारकांच्या खात्यात जमा करावी. शासन निर्णय, वित्त विभाग दि. २०/०२/२०१५ मधील परि. ८ (८) आणि शासन निर्णय वित्त विभाग क्र. अग्रीम-१०००/प्र.क्र.१३/२०००/विनियम, दि. ०५/०९/२००० मधील विहित नमुन्यात याबाबतची नोंद न चुकता अग्रीम धारकाच्या सेवापुस्तकात / सेवापटात घेण्यात यावी.

४. विशेष पोलीस महानिरीक्षक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय, वित्त विभाग क्र. घबांअ/२०१२/विनियम, दि. २०/०२/२०१५ अन्वये विहित केलेल्या अ.क्र.१ ते १४ अटी व शर्तींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. अग्रीम मंजूर करण्यापूर्वी कोणत्याही परिस्थितीत अट क्र. ६ ची पूर्तता होणे आवश्यक आहे. तसेच, घर खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे विहित मुदतीत संबंधीत कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घेण्याची व ताब्यात ठेवण्याची संपूर्णत: जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख यांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

५. शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीमाची रक्कम अदा करण्यापूर्वी शासन निर्णय दि. २०/०२/२०१५ नुसार त्यांचे संमतीपत्र / जामीन पत्र अभिलेखावर असल्याची खातरजमा करावी. तसेच, **त्यांना अग्रीमाचे दुबार वाटप होणार नाही याची दक्षता घ्यावी. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.** त्याचप्रमाणे अग्रीमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिल्यास, अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही शासन निर्णय, वित्त विभाग, दि. २०/०२/२०१५ मधील परि.८ (१२) नुसार घरबांधणी अग्रीम रकमेच्या आणि व्याजाच्या नियमीत व योग्य वसुलीसाठी संबंधीत अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहील, असे अग्रीमधारकास अवगत करावे. अर्जदारास मंजूर केलेला अग्रीम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केला आहे त्या कारणाकरिताच त्याने खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र (उदा. विकासक/जमीन मालक/कंत्राटदार किंवा बँक यांची रक्कम मिळाल्याची पावती) त्यांच्याकडून एक महिन्याच्या आत प्राप्त करुन घेऊन ते अभिलेखी ठेवावे व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

६. **विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी अग्रिमधारकास रक्कम वितरीत करण्यासाठी ॲक्सीस बँकेच्या Paypro या ऑनलाईन प्रणालीचाच वापर करावा. Paypro ची सुविधा कार्यालयास उपलब्ध नसल्यास ॲक्सीस बँकेच्या संबंधीत शाखेशी तात्काळ संपर्क साधून सदर सुविधा उपलब्ध करुन घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.**

७. अग्रीमाची रक्कम अर्जदारास तात्काळ अदा करुन, संबंधित अग्रिमधारकाकडून मुद्दल वसुलीबाबतची कार्यवाही या कार्यालयाच्या संदर्भाधिन परिपत्रकीय आदेश दि. ०७/०४/२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करुन, सदर वसूलीची रक्कम पोलीस महासंचालक यांचे DG of Police House Building Advance या नावाच्या ॲक्सीस बँकेतील खाते क्र. ९१७०२००८०५२५०२७, IFSC Code UTIB००००१२४ मध्ये जमा करावी, आणि MSPHC या मोड्युल मध्ये त्याबाबतची त्याक्षणी नोंद घ्यावी. तसेच सदर व्यवहाराचा UTR क्रमांक मोड्यूलमध्ये भरावा. अशा प्रकारे प्रत्येक महिन्याच्या अग्रीम हप्त्यांच्या वसूलीची रक्कम न चूकता जमा करण्याची दक्षता घ्यावी. **मुद्दलाचे हप्ते विलंबाने जमा केल्यास किंवा विहित मुदतीत जमा करुन मोड्युल मध्ये त्याबाबतची नोंद न घेतल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांची राहील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे

| Sr. | Sevarth ID | Sevarth Person Name | Unit ID | Unit Name | Sevarth Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | DGPSJBM8101 | SACHIN JAYPRAKASH BHABIRE | 134 | IG SRPF Pune | 2838000 |
| 2 | DGPPADM8501 | PRADIP ARUN DAGADE | 134 | IG SRPF Pune | 1436000 |
| 3 | DGPSDTM8102 | SATYAWAN DNYANOBA THOMBARE | 134 | IG SRPF Pune | 2200000 |
| | | | | | **6474000** |